इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय तसेच सर्व मंत्रालयीन विभाग व सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांकरिता कायमस्वरुपी पदांचा समावेश असलेला माहिती तंत्रज्ञान संवर्ग आणि महाराष्ट्र ई-मिशन टीम (MeMT) यांचा आकृतीबंध मंजुरीबाबत.

## महाराष्ट्र शासन

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग
शासन निर्णय क्र. आकृती-२०२६/प्र.क्र.०२/ प्रशा-१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ एप्रिल, २०२६.

संदर्भ :-

१. शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. आस्थापना-१२९८/प्र.क्र. २६/९८/१९, दि. ०७ मार्च, १९९८.
२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आस्था/१२९८/प्र.क्र.२४८/९९/१९, दि. १६ ऑक्टोबर, १९९९
३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आस्था/१२९९/प्र.क्र.२४६/९९/१९, दि. ०५ नोव्हेंबर, १९९९
४. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दि. १० सप्टेंबर, २००१.
५. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आस्था/१००१/प्र.क्र.२०/२००१/३९, दि. २० सप्टेंबर, २००१
६. शासन निर्णय वित्त विभाग क्र. असंक-११०१/प्र.क्र.२९ (भाग-२)/२००२/वित्तीय सुधारणा, दि. २६ फेब्रुवारी, २००२.
७. शासन निर्णय वित्त विभाग क्र. असंक-११०१/प्र.क्र.२९ (भाग-३) / २००२/वित्तीय सुधारणा, दि. ९ जानेवारी, २००३.
८. शासन निर्णय वित्त विभाग क्र. असंक-११०१/प्र.क्र.२९ (भाग-४)/२००२/वित्तीय सुधारणा, दि. २६ मार्च, २००४.
९. शासन निर्णय वित्त विभाग क्र. असंक-११०१/प्र.क्र.२९ (भाग-६)/२००२/वित्तीय सुधारणा, दि. १ जुलै, २००४.
१०. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. आढावा-१६१६/प्र.क्र.२१३/१९अ, दि. १७ जानेवारी, २०२३
११. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग (प्रशासकीय सुधारणा उत्कृष्टता व नाविन्यता ) क्र. शाकानि-२०२६/प्र.क्र.२०/र.व.का.-१, दि. २१ एप्रिल, २०२६.

१२.शासन निर्णय इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग क्र. आयुका-२०२६/ प्र.क्र.०१/प्रशा-१, दि. २४ एप्रिल, २०२६.

**प्रस्तावना :-**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. १० येथील शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला असून सदर आकृतीबंधातील परिशिष्ट-क मधील अ. क्र.६ अन्वये माहिती तंत्रज्ञान उपविभागासाठी एकूण ११ पदे मंजूर करण्यात आली आहेत. तसेच, संदर्भ क्र. १, २, ३ व ५ येथील शासन निर्णयान्वये माहिती तंत्रज्ञान उपविभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत माहिती तंत्रज्ञान संचालनालयासाठी एकूण २६ पदे मंजूर आहेत.

महाराष्ट्र राज्यात डिजिटल अर्थव्यवस्था, ई-प्रशासन, इलेक्ट्रॉनिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या क्षेत्रांचा वेगाने विकास होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, समन्वय व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा असावी, याकरिता नवीन इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाची स्थापना, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाची स्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान संवर्गाची स्थापना तसेच यासाठी निर्माण करावयाच्या आवश्यक पदनिर्मितीस अपर मुख्य सचिव, साप्रवि (सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने दि. २७ मार्च, २०२६ रोजीच्या बैठकीत व मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तर समितीच्या दि. ०२ एप्रिल, २०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. तसेच, सदर प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाच्या दि. ०७ एप्रिल, २०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

सदर पार्श्वभूमीवर सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. ११ येथील अधिसूचनेन्वये इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग हा नवीन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला आहे. तसेच संदर्भ क्र. १२ येथील दि. २४ एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय स्थापन करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग तसेच इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय तसेच माहिती तंत्रज्ञान संवर्ग याकरिता आकृतीबंध निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्यात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग तसेच इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय तसेच माहिती तंत्रज्ञान संवर्ग आणि महाराष्ट्र ई-मिशन टीम (MeMT) यांसाठी पदांचा आकृतीबंध खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

१) नवीन इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागासाठी (Electronics, Information Technology and Artificial Intelligence Department) ७४ पदे (६१ नियमित पदे व १३ बाह्ययंत्रणेद्वारे) निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (पदांचा तपशील **परिशिष्ट-अ** मध्ये नमूद केला आहे.)

२) नवीन इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयासाठी ७७ पदे (६२ नियमित पदे व १५ बाह्ययंत्रणेद्वारे) निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (पदांचा तपशील **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केला आहे.)

३) सामान्य प्रशासन विभागांतर्गत कार्यासन ३९ मधील मंजूर ११ पदे व माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या आकृतीबंधात सद्यस्थितीत मंजूर २६ पदे, या मधून आवश्यक पदे नवीन विभाग व आयुक्तालयात वर्ग करण्यास व इतर पदे निरसित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) मंत्रालयातील इतर प्रशासकीय विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये माहिती तंत्रज्ञान विषयक कामकाज हाताळण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्वतंत्र माहिती तंत्रज्ञान संवर्गांतर्गत (IT Cadre) ४२७ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. (पदांचा तपशील **परिशिष्ट-क** मध्ये नमूद केला आहे.)

५) महाराष्ट्र ई-मिशन टीम (MeMT) स्थापन करण्यास त्यासाठी तांत्रिक संवर्गातील ३८९ पदांच्या मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणेव्दारे / कंत्राटी तत्वावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र ई-मिशन टीम करिता आवश्यक तांत्रिक पदे बाह्ययंत्रणेद्वारे/कंत्राटी पद्धतीने घेतांना त्यांचा Tenure (कार्य-कालावधी) एकूण ५ वर्ष (३+१+१ प्रमाणे) इतका राहील. (पदांचा तपशील **परिशिष्ट-ड** मध्ये नमूद केला आहे.)

६) Flexi pool मनुष्यबळ तयार करण्यासाठी २०० पदांच्या मर्यादेत अभियांत्रिकी पदवी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी Internship योजना राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

I. उपरोक्त सर्व पदनिर्मिती पोटी येणाऱ्या सुमारे वार्षिक रु. १३३,३५,१३,६८०/- (अंदाजित) इतक्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

II. शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक असंक-१०-०१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दि.१० सप्टेंबर, २००१ अन्वये ६ व्या वेतन आयोगानुसार ज्या पदांचे ग्रेड वेतन रु.७६००/- व त्यापेक्षा अधिक आहे अशी एकुण ६२ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

III. उक्त नमूद पदसंख्येत बदल करावयाचे असेल तर, प्रचलित शासन नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

IV. प्रस्तावित नवीन विभागासाठी स्वतंत्र लेखाशिर्ष मंजूर करुन त्याव्दारे आवश्यक ती अर्थसंकल्पीय तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १००/२०२६, आ.पु.क. दि. २४ एप्रिल, २०२६ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२४१९४०५७६९११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.04.27 12:50:03 +05'30'

**(दुर्गाप्रसाद मैलावरम)**
**उप सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उप मुख्यमंत्री (न. वि., गृ.नि., सा.बां. (सा.ऊ.), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उप मुख्यमंत्री (रा. ऊ. शु, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक व औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. मा. मंत्री (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव (सेवा), सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. महालेखापाल-१, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१२. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल-२, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१४. महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१५. सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालये,
१६. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८. आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई,
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादीत, मुंबई,

२०. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,

२१. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,

२२. सदस्य सचिव, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मुंबई,

२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,

२५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालये (सर्व),

२६. सर्व मंत्रालयीन विभाग,

२७. निवडनस्ती/ प्रशा-१

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग शासन निर्णय क्र. आकृती-२०२६/प्र.क्र.०२/ प्रशा-१,
दि. २४/०४/२०२६ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट- अ

### इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्रालयीन विभाग :

| अ.क्र. | शाखा | नियमित पदे | बाह्ययंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय शाखा | ३१ | ०७ |
| २ | तांत्रिक शाखा | १२ | ०४ |
| ३ | विधि शाखा | १२ | ०१ |
| ४ | लेखा शाखा | ०६ | ०१ |
| **एकूण** | | **६१** | **१३** |

**(अ) प्रशासकीय शाखेकरीता नियमित पदे [Admin wing]:**

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सचिव/प्र.स./अ.मु.स.(भा.प्र.से.) | संवर्ग पद | ०१ |
| २ | उप सचिव | एस -२५: ७८८००-२०९२०० | ०१ |
| ३ | अवर सचिव | एस -२३ : ६७७००-२०८७०० | ०२ |
| ४ | वरिष्ठ स्वीय सहायक | एस-२४: ७११००-२११९०० | ०१ |
| ५ | कक्ष अधिकारी | एस -१७ :४७६००-१५११०० | ०५ |
| ६ | सहायक कक्ष अधिकारी | एस-१६ :४४९००-१४२४०० | ०८ |
| ७ | उच्च श्रेणी लघुलेखक | एस-१६ :४४९००- १४२४०० | ०१ |
| ८ | निम्न श्रेणी लघुलेखक (मराठी) | एस -१५ :४१८००-१३२३०० | ०२ |
| ९ | लिपिक-टंकलेखक | एस- ६ :१९९००-६३२०० | १० |
| **एकूण** | | | **३१** |

**बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवा**

| | | |
|---|---|---|
| १ | वाहनचालक | ०२ |
| २ | शिपाई | ०५ |
| **एकूण** | | **०७** |

**ब) तांत्रिक शाखेकरीता [Technical wing] :**

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | तांत्रिक संचालक (Technical Director) | एस-२९:१३११००-२१६६०० | ०१ |
| २ | सह संचालक (Joint Director) | एस-२७: ११८५००-२१४१०० | ०१ |
| ३ | सहायक संचालक (Assistant Director) | एस-२५ :७८८००-२०९२०० | ०१ |
| ४ | विश्लेषक कम प्रोग्रामर (Analyst cum Programmer) | एस-२३:६७७००-२०८७०० | ०२ |
| ५ | सॉफ्टवेअर प्रोग्रामर (Software Programmer | एस-२०: ५६१००-१७७५०० | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | डाटा असिस्टंट | एस-१६ : ४४९००-१४२४०० | ०४ |
| ७ | उच्च श्रेणी लघुलेखक | एस-१६: ४४९००-१४२४०० | ०१ |
| ८ | निम्न श्रेणी लघुलेखक | एस-१५: ४१८००-१३२३०० | ०१ |
| एकूण | | | **१२** |

**बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवा**

| | | |
|---|---|---|
| १ | शिपाई | ०३ |
| २ | वाहनचालक | ०१ |
| **एकूण** | | **०४** |

**क) विधि शाखेकरिता [Legal wing]:**

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | उप सचिव (विधि) | एस-२५: ७८८००-२०९२००) | ०१ |
| २ | अवर सचिव (विधि) | एस-२३: ६७७००-२०८७०० | ०२ |
| ३ | सहायक(विधि) | एस-१५: ४१८००-१३२३०० | ०४ |
| ४ | लिपिक-टंकलेखक | एस- ६: १९९००-६३२०० | ०४ |
| ५ | निम्न श्रेणी लघुलेखक | एस-१५: ४१८००-१३२३०० | ०१ |
| **एकूण** | | | **१२** |

**बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवा**

| | | |
|---|---|---|
| १ | शिपाई | ०१ |
| **एकूण** | | **०१** |

**ड) लेखा शाखेकरिता [Accounts wing]:**

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | सहायक संचालक (लेखा) | एस -२० : ५६१००-१७७५०० | ०१ |
| २ | लेखा अधिकारी | एस -१६ : ४४९००-१४२४०० | ०१ |
| ३ | सहायक लेखा अधिकारी | एस -१५ : ४१८००-१३२३०० | ०२ |
| ४ | लिपिक-टंकलेखक | एस- ६ :१९९००-६३२००) | ०२ |
| **एकूण** | | | **०६** |

**बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवा**

| | | |
|---|---|---|
| १ | शिपाई | ०१ |
| **एकूण** | | **०१** |

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग शासन निर्णय क्र. आकृती-२०२६/प्र.क्र.०२/प्रशा-१,
दि. २४/०४/२०२६ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट- ब

## इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय:

| अ.क्र | शाखा | नियमित पदे | बाह्ययंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय शाखा | १२ | ०५ |
| २ | तांत्रिक शाखा | ५० | १० |
| **एकूण** | | **६२** | **१५** |

### (अ) प्रशासकीय शाखेकरीता [Admin wing]:

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | आयुक्त ( भा.प्र.से.) | संवर्ग पद | ०१ |
| २ | सहायक आयुक्त | एस-२०: ५६१००-१७७५०० | ०१ |
| ३ | सहायक संचालक (लेखा) | एस -२० : ५६१००-१७७५०० | ०१ |
| ४ | लेखाधिकारी | एस -१६: ४४९००-१४२४०० | ०१ |
| ५ | सहायक लेखाधिकारी | एस-१५: ४१८००- १३२३०० | ०१ |
| ६ | उच्च श्रेणी लघुलेखक | एस-१६: ४४९००- १४२४०० | ०१ |
| ७ | निम्न श्रेणी लघुलेखक | एस-१५: ४१८००- १३२३०० | ०१ |
| ८ | वरिष्ठ लिपिक | एस-८: २५५००-८११०० | ०२ |
| ९ | कनिष्ठ लिपिक | एस-६: १९९००-६३२०० | ०३ |
| **एकूण** | | | **१२** |

**बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या मनुष्यबळ सेवा**

| | | |
|---|---|---|
| १ | वाहनचालक | ०२ |
| २ | शिपाई | ०३ |
| **एकूण** | | **०५** |

### ब)तांत्रिक शाखेकरीता [Technical wing]:

| अ.क्र | अधिकारी/कर्मचारी पदनाम | वेतनश्रेणी- | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | तांत्रिक संचालक (Technical Director) | एस-२९: १३११००-२१६६०० | ०२ |
| २ | सह संचालक (तांत्रिक) (Joint Director) | एस-२७: ११८५००-२१४१०० | ०२ |
| ३ | सहायक संचालक (तांत्रिक) (Assistant Director) | एस-२५: ७८८००-२०९२०० | ०२ |
| ४ | विश्लेषक कम प्रोग्रामर (Analyst cum Programmer) | एस-२३: ६७७००-२०८७०० | ०८ |
| ५ | सॉफ्टवेअर प्रोग्रामर (Software Programmer) | एस-२०: ५६१००-१७७५०० | १६ |
| ६ | उच्च श्रेणी लघुलेखक | एस-१६: ४४९००- १४२४०० | ०२ |
| ७ | निम्न श्रेणी लघुलेखक | एस-१५: ४१८००- १३२३०० | ०२ |
| ८ | डाटा असिस्टंट | एस-१६: ४४९००- १४२४०० | १६ |

| | |
|---|---|
| **एकूण** | ५० |

**बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या  मनुष्यबळ सेवा**

| | | |
|---|---|---|
| १ | वाहनचालक | ०४ |
| २ | शिपाई | ०६ |
| **एकूण** | | **१०** |

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग शासन निर्णय क्र. आकृती-२०२६/प्र.क्र.०२/प्रशा-१,
दि. २४/०४/२०२६ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट- क

**मंत्रालयातील इतर प्रशासकीय विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयांसाठी स्थायी माहिती व तंत्रज्ञान संवर्ग गोषवारा मंत्रालयीन प्रशासकीय विभागांची वर्गवारी साधारणपणे ३ स्तरांमध्ये करण्यात येईल.**

| अ. क्र. | विभागाचे नाव | सह संचालक (Joint Director) (S-27, 118500-214100) | सहायक संचालक (Assistant Director) (S-25, 78800-209200) | विश्लेषक कम प्रोग्रामर (Analyst cum Programmer) (S-23, 67700-208700) | सॉफ्टवेअर प्रोग्रामर (Software Programmer) (S-20, 56100-177500) | डाटा असिस्टंट (Data Assistant) (S-16), 44900-142400 | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोठे विभाग | ०६ | १२ | १८ | १८ | ५४ | १०८ |
| २ | मध्यम विभाग | ०० | १५ | १५ | १५ | ३० | ७५ |
| ३ | लहान विभाग | ०० | १६ | १६ | १६ | १६ | ६४ |
| ४ | ३६ जिल्हाधिकारी कार्यालये | ०० | ०० | ३६ | ३६ | १०८ | १८० |
| | **एकूण** | **०६** | **४३** | **८५** | **८५** | **२०८** | **४२७** |

इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग शासन निर्णय क्र. आकृती-२०२६/प्र.क्र.०२/प्रशा-१,
दि. २४/०४/२०२६ सोबतचे परिशिष्ट

## परिशिष्ट - ड

## महाराष्ट्र ई-मिशन टिम (MeMT)

| पदनाम / विभाग | तांत्रिक संचालक (TD MeMT) | सह संचालक (JD MeMT) | सहायक संचालक (AD MeMT) | विश्लेषक कम प्रोग्रामर (ACP MeMT) | नेटवर्क व हार्डवेअर विशेषज्ञ (Network & Hardware Specialist) | बिझनेस अनेलिस्ट (Business Analyst) | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग | १ | ३ | ९ | ० | ५ | ५ | २३ |
| इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय | २ | ३ | ९ | ० | २ | ५ | २१ |
| इतर मंत्रालयीन विभाग | ० | ० | ४९ | ० | ४९ | ६७ | १६५ |
| जिल्हाधिकारी कार्यालये | ० | ० | ० | ७२ | ३६ | ७२ | १८० |
| **एकूण** | **०३** | **०६** | **६७** | **७२** | **९२** | **१४९** | **३८९** |

| अ. क्र | पदनाम | वेतन (प्रतिमाह) | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | संचालक (तांत्रिक) (Director - Technical) MeMT | ७.५ लक्ष (८% वार्षिक वाढ) | ०३ |
| २ | सह संचालक (तांत्रिक) (Joint Director- Technical) MeMT | ५ लक्ष (८% वार्षिक वाढ) | ०६ |
| ३ | सहाय्यक संचालक (तांत्रिक) (Assistant Director-Technical) MeMT | २.५ लक्ष (८% वार्षिक वाढ) | ६७ |
| ४ | विश्लेषक कम प्रोग्रामर (Analyst cum Programmer) | १.५ लक्ष (८% वार्षिक वाढ) | ७२ |
| ५ | नेटवर्क व हार्डवेअर विशेषज्ञ (Network and Hardware Specialist) | ७५००० (८% वार्षिक वाढ) | ९२ |
| ६ | बिझनेस ॲनॅलिस्ट (Business Analyst) | ७५००० (८% वार्षिक वाढ) | १४९ |
| **एकूण** | | | **३८९** |

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | |
|---|---|---|---|
| 1 | Flexi Pool Manpower (Interns) | २०० | On Academic Credits as per Internship policy |